नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८५/२०२२
(वत्सला शारबिद्रे व.५ वि. इम्रान मुजावर)

**:– निशाणी ३७ खालील आदेश –:**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी सदरी प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करुन घेणकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरोधात कायम ताकिद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. गाव मौजे कुडाळ येथील सर्व्हे नं. ३२५अ१, हिस्सा नं. १६, क्षेत्र ०–०५–००, पो.ख. ०–०५–०० ही दावा मिळकत आहे. सदर दाव्याचे कामी कोर्ट कमिशनचे वेळी सदरील पक्षकार यांना दाव्याची समज मिळालेवरुन सदर दाव्याबाबत सदरील पक्षकार यांनी माहिती घेतली. प्रत्यक्षात सदर दावा मिळकतीकडे वादी यांचा काहीही हक्कसंबंध नाही. सदरील दावा मिळकत ही वादी यांचे कधीही ताब्यात, कब्जात, वहिवाटीत नाही. वादी यांच विना अडथळा दावा मिळकतीमध्ये वहिवाट चालू आहे, ही बाब देखील पुर्णपणे खोटी व खोडसाळ आहे. प्रत्यक्षात सदरील दावा मिळकत ही त्रयस्थ पक्षकार यांचे सामाईक मालकीची मिळकत असून वादी यांचा सदर मिळकतीकडे कधीही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नव्हता व नाही. दाव्याचे परिच्छेद नं. ४ मध्ये, "वादी यांनी दावा मिळकतीस कुळ म्हणुन आपले नाव लागण्यासाठी तहसलिदार कुडाळ यांचे न्यायालयात टेनन्सी केस नं. ४१/२०१७ अन्वये कुळ कायदा कलम ७०ब अन्वये अर्ज दाखल केलेला होता." त्या अर्जाच्या अनुषंगाने वादी हे कुळ असल्याबाबतचा तहसिलदार कुडाळ यांनी आदेश केला होता" असा उल्लेख केला आहे. परंतु प्रत्यक्षात टेनन्सी केस नं. ४१/२०१७ ही वादी यांनी प्रतिवादी व इतर सहभागदार यांचे विरोधात दाखल केली होती व तहसिलदार कुडाळ यांनी दिलेल्या आदेशाचे विरोधात त्रयस्थ पक्षकार यांनी दावा मिळकतीचे मालक या नात्याने टेनन्सी अपील नं. ६३/२०१८ ही उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचे न्यायालयात दाखल केला व तहसिलदार कुडाळ यांनी टेनन्सी केस नं. ४१/२०१७ मध्ये वादी कुळ असल्याबाबतचा जो आदेश केला होता तो रद्द केला. याउलट, सदरची दावा मिळकत ही त्रयस्थ पक्षकार यांचे आजही ताब्यात,

कब्जात, वहिवाटीत आहे. त्यानंतर वादी यांनी उपविभागीय अधिकारी कुडाळ यांनी टेनन्सी केस नं. ६३/२०१८ मधील आदेशाच्या विरोधात मुंबई येथील महसुल न्यायाधिकरण यांचे न्यायालयात टेनन्सी रिव्हीजन नं. १३३/२०२२ त्रयस्थ पक्षकार यांचे विरोधात दाखल केले आहे व ते प्रलंबित आहे. परंतु, सदर बाब वादी यांनी दाव्याचे कामी वगळली असून दावा मिळकतीकडे आपली वहिवाट आहे असे कथन केले आहे. अशा परिस्थितीत त्रयस्थ पक्षकार यांना या दाव्याचे कामी ते दावा मिळकतीचे मालक असल्याने व वादी यांची दावा मिळकतीकडे वहिवाट आहे किंवा कसे हा मुद्दा प्रलंबित असल्याने सदर दाव्याचे कामी त्रयस्थ पक्षकार यांना प्रतिवादी म्हणुन दाव्याचे कामी समाविष्ट करुन घेण्याची विनंती केली आहे.

०३. वादीने नि.५३ येथे आपले म्हणणे देवून सदर अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले की, वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो कायद्याच्या कक्षेत नाही. दावा मिळकत वादी यांच्याकडे पुर्वजांपासून कुळ म्हणुन प्रत्यक्ष वहीवाटीस व कब्जाभोग्यास व विनाहरकत ताब्यात असून सदर मिळकतीमध्ये वादी कुटुंबिय यांची विनाअडथळा वहिवाट चालू आहे. प्रत्यक्ष दावा मिळकतीकडे त्रयस्थ पक्षकार यांचा मालक अथवा कुळ वहिवाटदार म्हणुन कोणताही संबंध नाही. दावा मिळकती संदर्भात त्रयस्थ पक्षकार यांनी वादी कुटुंबियाविरुध्द दिवाणी न्यायालय कुडाळ येथे ३२/२००१ हा दावा हक्क प्रस्थापना व खुला कब्जा मिळण्यासाठी दाखल केला होता तो दावा दिनांक ०८/०६/२००९ रोजी फेटाळण्यात आला. सदर दाव्याचे निकालाचे विवेचन केल्यास दावा विषयक मिळकतीकडे व वादी कुटुंबियांचे राहते घर या मिळकतीकडे त्यांची यांची कब्जाभोग्य वहिवाट गेली बरीच वर्षे आहे हे मान्य केले आहे. अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे कुळ कायद्याचा मुद्दा प्रलंबित आहे, परंतु कुळ कायद्याने सदरची मिळकत वादी यांच्या नावे दाखल आहे. या दाव्याचे कामी जे प्रतिवादी दाखल केलेले आहेत ते लगत कब्जेदार असून त्यांचा या मिळकतीशी काडीमात्रही संबंध नाही. सदरचा दावा हा प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण याबाबत असल्याने अर्जदार यांना या कामी पक्षकार करणे कायद्याने योग्य ठरणारे नाही. अर्जदार व वादी यांचा कुळपणाचा हक्क ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्र महसुल प्राधिकरणास आहे. या न्यायालयास तो हक्क ठरविण्याचा अधिकार नसल्याने अर्जदार यांना पक्षकार करणे हितावह ठरणारे नाही.

सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०४. प्रतिवादीने निशाणी ५५ येथे सदर अर्ज दाखल करुन त्रसस्थ पक्षकार यांना दाव्याचे कामी पक्षकार केल्यास दावा मिळकतीबाबतची खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्यास मदत होणारी असल्याने त्यांना दाव्याचे कामी प्रतिवादी सदरी सामील करुन घेण्यास प्रतिवादी यांची कोणतीही हरकत नाही असे कथन केले आहे.

०५. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार, वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये अशी प्रतिवादीविरुध्द कायम ताकिद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी दावा मिळकत त्यांच्या पुर्वजांपासून त्यांच्याकडे कुळ म्हणुन प्रत्यक्ष वहिवाटीस व कब्जाभोग्यास व विना हरकत ताब्यात असून सदर मिळकतीकडे वादी कुटुंबियांची विना हरकत अडथळा वहिवाट चालू आहे असे वादीने दाव्यात केलेले कथन खोटे व खोडसाळ आहे. प्रत्यक्ष दावा मिळकत ही अर्जदार यांची सामाईक मिळकत असून वादी यांचा सदर मिळकतीकडे कधीही कोणताही हक्कसंबंध नव्हता व नाही. टेनन्सी केस नं. ४१/२०१७ मध्ये तहसिलदार कुडाळ यांनी वादी हे कुळ असल्याबाबतचा आदेश केलेला होता. परंतु सदरचा आदेश हा टेनन्सी केस नं. ६३/२०१८ उपविभागीय अधिकारी कुडाळ यांनी रद्दबातल केलेला आहे. त्यावर वादीने मुंबई येथील महसुल न्यायाधीकरण येथे टेनन्सी रिव्हीजन नं. १३३/२०२२ हे अर्जदार यांचे विरोधात दाखल केलेले आहे. सदरची केस ही महसुल न्यायाधीकरण यांचे न्यायालयात प्रलंबित आहे. वादी यांची दावा मिळकतीकडे कुळ म्हणुन वहिवाट आहे किंवा कसे हा मुद्दा प्रलंबित असल्याने अर्जदार यांना याकामी दावा मिळकतीचे मालक म्हणुन शामील करावे असा युक्तीवाद अर्जदार यांचे विधीज्ञांनी केला.

०७. प्रस्तुत अर्जाचे स्वरुप व त्यातील मागणी लक्षात घेता, दावा मिळकतीकडे कोणाची कब्जाभोग्य व वहिवाट आहे हे शाबीत होणे अत्यावश्यक आहे.

प्रस्तुतच्या दाव्यात वादीने दावा मिळकतीकडे कोणतीही हक्कप्रस्थापनेची मागणी केलेली दिसून येत नाही. त्यामुळे सदर दाव्याचे अनुषंगाने वादीची दावा मिळकतीमध्ये प्रत्यक्ष कब्जाभोग्य वहिवाट आहे किंवा कसे हे प्रस्तुतचा दावा न्यायनिर्णीत करण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. परंतु, सदरच्या अर्जात अर्जदाराने टेनन्सी अपिल नं. ६३/२०१८ अन्वये वादी यांचा कुळपणा आदेश रद्द झालेला असून सदरील मिळकत ही आता पुर्वस्थितीत आलेली आहे. तसेच, सदरील दावा मिळकत ही अर्जदार यांचे ताब्यात व कब्जेवहिवाटीत आहे असे कथन केले आहे. अर्जदाराने सदर कथनाच्या पुष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केलेला दिसून येत नाही. तसेच, प्रस्तुतच्या दाव्यातील कायम ताकिदीची मागणी ही अर्जदाराच्या विरुध्द केलेली नाही. त्यामुळे अर्जदाराचा अपरोक्ष प्रस्तुतचा दावा गुणदोषावर न्यायनिर्णीत झाल्यास त्यांच्या न्यायाहक्कावर कोणीतीही बाधा येणारी नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीच्या हक्कप्रस्थापनाबाबत नसल्याने ते या दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत असे म्हणता येणार नाही. दावा मिळकतीच्या सातबाराचे अवलोकन केले असता, अर्जदारा व्यतिरिक्त इतरही व्यक्तिंची नावे भोगवटदार सदरी असल्याचे दिसून येते. परंतु, दाव्याचे स्वरुप व मागणी पाहता सर्व पक्षकारांना सामिल करुन घेणे हे न्यायोचीत होणार नाही.

०८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(२) मधील तरतुदीनुसार 'कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षकाराकडून आलेल्या अर्जावरुन किंवा तसा अर्ज आला नसतानाही त्यांनी न्यायालयास न्याय वाटतील अशा अटीवर ज्या व्यक्तीला वादी म्हणुन किंवा प्रतिवादी म्हणुन सामिल करुन घ्यावयास हवे होते किंवा दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांच्या परिणामकारकरित्या व पुर्णपणे अधिनिर्णय करुन ते निकालात काढणे न्यायालयास शकय होण्यासाठी ज्या व्यक्तिंची न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असेल अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव जादा दाखल करण्यात यावे असा आदेश न्यायालयास देता येईल. ' उपरोक्त तरतुदीनुसार, अर्जदार हे दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत नाही. सबब, उपरोक्त विवेचनानुसार मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

नि. ३७ कडील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.04.05 18:49:46 +0530

दिनांक- ०५/०४/२०२४

(प.रा.ढोरे)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.